## नियमित दिवाणी दावा क्र.२२/२०१८ मध्ये
## निशाणी क्र.१८ खालील आदेश.
## (CNR No. MHNS160002252018)

०१. प्रस्तुत अर्जान्वये वादी यांनी दिवाणी प्रकिया संहिता आदेशीका २६, नियम ९ अन्वये न्यायालयीन आयोगाच्या नियुक्तीसाठी सादर केलेला आहे.

०२. अर्ज वाचला. संधी देवुनही प्रतिवादी यांनी अर्जास त्यांचा जबाब नोंदविला नाही.

०३. वादींतर्फे विधीज्ञ श्री.पी.डी.पवार व प्रतिवादीं तर्फे विधीज्ञ श्री.ए.टी.देवरे यांचा युक्तीवाद श्रवण केला.

०४. उभयपक्षांच्या कथनावरुन खालील मुददे माझे अवलोकनार्थ येउन त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेवरुन दिले ते खालील प्रमाणे ;

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
| --- | --- | --- |
| ०१ | उभयपक्षातील वादाच्या संपुर्ण निराकरण करण्यासाठी न्यायालयीन आयुक्तांची नेमणुक करणे आवश्यक आहे का ? | होकारार्थी. |
| ०२ | वादी मागणीप्रमाणे आदेश मिळण्यास पात्र आहे काय ? | होकारार्थी |
| ०३ | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

:: **कारणमिमांसा** ::

मुद्दा क्र. १ ते ३ :

०५. वादी यांनी असे कथन केले आहे की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा

मो.र.नं.३०५०/२०१५ अन्वये दि.१६.०६.२०१५ रोजी मोजणी करुन दि.२९.०६.२०१५ रोजी प्रत्यक्ष हददी दाखविल्या व नकाशा तयार केला त्यानुसार प्रतिवादी यांनी वादी यांची शेतजमीन गट क्र.३७ मध्ये पश्चिम बाजुस ०हे०५आर क्षेत्रात अतिक्रमण केले व त्या अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा वादी यांना मो.र.नं.३०५०/२०१५ चे मोजणी नकाशामध्ये दाखविल्याप्रमाणे मिळावा तसेच दरम्याने उत्पन्न व नुकसान भरपाई मिळण्यासाठी दाखल केला आहे. सदर दाव्यात प्रतिवादी हजर होवुन त्यांनी लेखी कैफियत दाखल केली आहे. दाव्यात मुददे निश्चित करण्यात येवुन दावा चौकशीसाठी नेमलेला आहे. दाव्यात चौकशीचे कामकाज सुरु होण्यापुर्वी अतिक्रमणाच्या कब्जासाठीच्या दाव्यात अतिक्रमण केलेल्या व अतिक्रमण झालेल्या शेतजमीनीची संयुक्त मोजणी करुन तसा मोजणी नकाशा हूकूमनाम्यासोबत असावा असे मा. वरिष्ठ न्यायालयातील न्यायनिवाडे आहेत म्हणुन प्रस्तुत दाव्यातील वादी व प्रतिवादी यांच्या मिळकतीची संयुक्त मोजणी करण्याकामी दाखल केलेला आहे.

०६. वादी यांच्या कथनाप्रमाणे दावा मिळकत ३७/१ व ३७/२ व प्रतिवादी यांची शेतजमीन गट क्र.३८ यांची संयुक्त मोजणी होण्यासाठीचा अर्ज दाखल केलेला आहे. तसेच, वादी यांनी अभिलेखावर मो.र.नं.३०५०/२०१५ चा नकाशाही दाखल केलेला आहे. सदर नकाशाची पाहणी केली असता, वादी यांच्या वर कथनाप्रमाणे संयुक्त मोजणी झाल्याचे दिसुन येत नाही. त्याशिवाय प्रस्तुत दाव्याचे निराकरण योग्यरित्या होणार नाही कारण प्रस्तुतचा दावा हा अतिक्रमणाबाबतचा आहे. सबब, सदरचे कारण हे प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यास योग्य वाटते. तसेच, वादी हे प्रस्तावित मोजणीचा खर्च सोसण्यास

तयार आहेत. त्यामुळे, सदरचा खर्च हा वादी यांनी करणे न्यायोचीत वाटते. सबब, मुददा क्र.१ व २ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवुन मुददा क्र.३ करीता खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे ;

**:: आदेश ::**

१. उप अधिक्षक, भुमी अभिलेख, चांदवड यांना या प्रकरणात न्यायालयीन आयोग म्हणुन नियुक्त करण्यांत येत आहे.

२. न्यायालयीन आयोगाने दावा मिळकतींची संयुक्त मोजणी अर्जात विनंती केल्याप्रमाणे भूमापन संहितेन्वये करावी व मोजणी नकाशा तयार करुन सविस्तर मोजणी अहवाल न्यायालयात तात्काळ सादर करावा.

३. मोजणीसाठी आवश्यक दस्तऐवज पुर्तता वादीने तात्काळ करावी.

४. न्यायालयीन आयोगाचे आवश्यक शुल्क वादीने सदर कार्यालयात जमा करावे व त्या संदर्भात न्यायालयास कळवावे.

SUNIL BHIMRAO MANE

Digitally signed by SUNIL BHIMRAO MANE
Date: 2023.01.18 15:43:17 +0530

दिनांक – १८.०१.२०२३

(सुनिल भि.माने)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
चांदवड.